बन्सीलाल रामनाथ अगरवाल चॅरिटेबल ट्रस्ट संचलित
विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी
(सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न स्वायत्त संस्था)
(पुर्वीचे पुणे विद्यापीठ)
६६६, अप्पर इंदिरानगर, बिबवेवाडी, पुणे - ४११ ०३७.
Approved by A. I. C. T. E. New Delhi

Bansilal Ramnath Agarwal Charitable Trust's
Vishwakarma Institute of Technology
An Autonomous Institute Affiliated to Savitribai Phule Pune University
(Formerly University of Pune)
666, Upper Indiranagar, Bibwewadi, Pune - 411 037.
Identification No. - PU/PN/Engg./061/(1984)

नोटीस क्र. २४७ | नोटीस | दि.०८/०५/२०२४

**शैक्षणिक वर्ष २०२३-२४ महाडीबीटी पोर्टलवरून SC/ST/OBC/SBC/VJ/DT/NT शिष्यवृत्ती अथवा फ्रिशीप/ईबीसी/ अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती/दिव्यांग शिष्यवृत्ती/ डॉ. पंजाबराव देशमुख निर्वाहभत्ता योजना व इतर विविध योजनेकरिता ऑनलाईन अर्ज भरणेकरिता दि. १५/०६/२०२४ पर्यंत वाढविलेल्या मुदतीबाबत.**

**संदर्भ-**
**१) महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर देण्यात आलेली स्कॉलरशिप नोटीस क्र. २२६, दि. ३१/१०/२०२३**
**२) महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर देण्यात आलेली स्कॉलरशिप नोटीस क्र. २३२, दि. ०९/११/२०२३**
**३) महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर देण्यात आलेली स्कॉलरशिप नोटीस क्र. २४०, दि. १२/०१/२०२४**
**४) महाविद्यालयाची संकेतस्थळावर जाहीर केलेली नोटीस क्र. २४६, दि. ८/४/२०२४**
**५) महाडीबीटी पोर्टलवर स्कॉलरशिप व इतर योजनेसाठी दि. १५ जून २४ पर्यंतच्या मुदतीवाढीबाबतची सूचना.**

महाविदयालयातील SC/ST/OBC/SBC/VJ/DT/NT/Open-EBC/ EWS) जे विद्यार्थी जे केंद्रिय प्रवेश प्रक्रियेव्दारा (कॅप) प्रवेशित म्हणजेच प्रथम/व्दितीय/तृतीय/अंतिम वर्ष बी.टेक किंवा प्रथम/व्दितीय वर्ष-एम.टेक-(एम.टेक मधील प्रवेशित विद्यार्थी म्हणजे फक्त SC/ST या प्रवर्गातील असवा) आहे/आहेत अशा सर्व विद्यार्थ्यांनी त्यांना लागू असलेल्या शिष्यवृत्ती/फ्रिशीप/ईबीसी/ अपंग शिष्यवृत्ती/अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती व इतर शिष्यवृती / निर्वाहभत्तेच्या योजनेस पात्र ठरत आहेत परंतू अद्यापही काही कारणास्तव महाडीबीटी पोर्टलवरून ऑनलाईन अर्ज भरू शकलेले नाहीत अशा विद्यार्थ्यांचे आर्थिक नुकसान होऊ नये म्हणून शासनाच्या संबंधित विभागाने ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी विद्यार्थ्यांकरिता **दि. १५ जून २०२४** पर्यंत अंमित मुदतवाढ जाहीर केलेली आहे. अर्ज भरण्याकरिता विद्यार्थ्यांनी

**तरी या नोटीसव्दारे अद्यापही महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज न भरलेल्या सर्व विद्यार्थ्याना कळविण्यात येते की,**

१) विद्यार्थ्यांनी दि. १५/०६/२०२४ पूर्वी अर्ज भरून त्याची प्रत महाविद्यालयात जमा करावी.
२) तसेच ज्या विदयार्थ्यांचे प्रवेश Institute Level स्तरावर झालेले आहेत परंतू शासनाच्या नियमानुसार ते **Post** Matrics Scholarship (शिष्यवृत्ती) योजनेसाठी म्हणजेच ज्या (SC/ST-income limit below 2.5 Lakhs, OBC-SBC/VJNT- limit below 1.5 Lakh) असल्यास ते पात्र ठरत असतील अशा विद्यार्थ्यांनी देखील मुदतीपूर्वी ऑनलाईन अर्ज भरून घ्यावेत व महाविद्यालयात सादर करावेत, विद्या
३) ज्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ प्रवेशाच्या वेळी शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क अथवा विकास निधी इत्यादी सवलतीचा लाभ घेवून प्रवेश घेतलेला आहे परंतू ऑनलाईन भरलेले अर्ज व कागदपत्रे वर दिलेल्या मुदतीत सादर करणार नाहीत अशा विद्यार्थ्यांना दिलेली शिष्यवृत्ती/फ्रिशीपी रक्कम शासनाकडून महाविद्यालयात प्रतिपूर्ती होणार नाही, परिणामी त्यास देण्यात आलेल्या सर्व शुल्काची वसूली संबंधित विद्यार्थ्यांकडून केली जाईल व त्यानंतर कोणाची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.
४) विद्यार्थी पात्र असूनही कोणत्याही कारणासाठी ऑनलाईन अर्ज सादर न केल्यामुळे होणाऱ्या नुकसानीसाठी जबाबदार राहील.

विद्यार्थ्यांच्या माहितीस्तव ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी लागणाऱ्या कागदपत्रांची यादी तसेच प्रवर्गानुसार व उत्पन्ननिहाय योजनेचा तपशील खालील दिला आहे त्याचा उपयोग करून अर्ज भरणे प्रक्रिया दि.१५/०६/२०२४ पूर्वी पूर्ण करावी.

या नोटीस सोबत विद्यार्थ्यांने त्या लागू असेलेल्या शासनाच्या योजनांची माहिती तसेच कागदपत्रे यांची यादी जोडलेली आहे त्याचे अनुकरण करून अर्ज भरण्याची प्रक्रिया वर दिलेल्या मुदतीत पूर्ण करावी. महाडीबीटी पोर्टलवरून अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण न केल्यास व त्याकामी विद्यार्थ्याचे आर्थिक नुकसान झाल्यास त्यास महाविद्यालय जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

**टिप- ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर कागदपत्रांसह त्याचे तपासणीसाठी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात उपस्थित राहावे.**

B.R.A.C.TRUST विश्वकर्मा इन्स्टिट्यूट पुणे - ३७ Vishwakarma Institute of Technology

प्रबधक
विश्वकर्मा इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी, पुणे-३७

प्रत:- १) सर्व विभाग प्रमुख यांना माहितीसाठी व विभागातील नोटीस बोर्डसाठी, २) महाविद्यालयातील सर्व नोटीस बोर्डकरिता- विद्यार्थ्यांच्या माहितीस्तव ३) सिस्टीम विभाग प्रमुख यांना महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर अपलोड करणेकरिता.